# शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नी रोड, मुंबई - ४०० ००४.
## मागासवर्गीय अनुशेष पूर्ण करण्यासाठी पदभरती - २०११
## शुध्दीपत्र

**१)** दि.१०.१०.२०११ रोजी नवाकाळ आणि वार्ताहर या वृत्तपत्रामधून प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीन्वये शासकीय मध्यवर्ती मुद्रणालयांतर्गत खालील परिच्छेद ३ मध्ये नमुद सरळसेवेने भरावयाच्या पदांकरीता पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात आले होते. सदरहू जाहिरातीमध्ये परिच्छेद ४ अंतर्गत शैक्षणिक अर्हता व अनुभव यामध्ये सुधारणा करण्यात आली असून सुधारित सेवाप्रवेशानुसार पात्र उमेदवाराकडून अर्ज मागविण्यांत येत आहेत. पदभरतीसाठी पदनिहाय सामाजिक आरक्षण व समांतर आरक्षणांचे तपशिल देखील परिच्छेद ३ मधील विवरणपत्रात नमुद केल्या प्रमाणे आहेत. **(दि.१०.११.२०११ रोजीच्या जाहिरातीच्या अनुषंगाने ज्या उमेदवारांनी यापूर्वी अर्ज केले असतील त्यांनी पुन:श्च अर्ज करु नये. पूर्वी ज्या उमेदवारांनी अर्ज केलेले आहेत त्याबाबतची कार्यवाही सूरु आहे)**

**२)** इच्छूक व पात्र उमेदवारांनी विहीत नमुन्यातील अर्ज व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नेताजी सुभाष रोड, चर्नी रोड, मुंबई-४०० ००४ या पत्यावर पोष्टाने पाठवावे अथवा समक्ष आणून द्यावेत. ज्या उमेदवारांनी सहाय्यक संचालक, जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र, सहाय्यक संचालक, रोजगार व स्वयंरोजगार माहिती व मार्गदर्शन केंद्र विद्यापीठ, प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदीवासी विकास प्रकल्प व विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, इ. कार्यालयात रोजगारासाठी नावे नोंदणी केली असेल त्यांनी देखील ते इच्छूक व पात्र असल्यास विहीत शुल्क भरुन विहित नमुन्यात या पदांसाठी अर्ज करणे आवश्यक राहील.

**३) सरळ सेवा भरतीने भरणेसाठी घोषित पदे**

| अ. क्र. | सामाजिक प्रवर्ग | भरावयाची एकूण पदे | महिला | माजी सैनिक | खेळाडू | भूकंपग्रस्त | प्रकल्पग्रस्त | पदवीधर/ पदवीका-धारक/ अंशकालीन कर्मचारी | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | ३०% | १५% | ५% | २% | ५% | १०% | |
| १ | परिचर प्रतिरुप | | | | | | | | |
| | अ.जा. | २ | ० | १ | ० | ० | १ | ० | ० |
| | अ.ज. | ४ | ० | १ | ० | ० | ० | ० | ३ |
| | वि.जा.अ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | भ.ज.ब | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | २ |
| | भ.ज.क | ३ | ० | १ | ० | ० | ० | ० | २ |
| | भ.ज.ड | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | २ |
| | एकूण | १४ | ० | ३ | ० | ० | १ | ० | १० |
| २ | मुलप्रतवाचक | | | | | | | | |
| | भ.ज.क | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | १ |
| | एकूण | २ | १ | ० | ० | ० | ० | ० | १ |

टिप :-

१) **भरतीसाठी जाहिर केलेल्या रिक्त पदांच्या संख्येत वाढ किंवा कमी होण्याची शक्यता आहे.** पदांची संख्या, प्रवर्गनिहाय पदसंख्या, समांतर आरक्षण या बाबत बदल करणे, परिक्षा कोणत्याही टप्प्यावर स्थगित करणे, रद्द करणे, अंशत: बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार गट `क` पदांच्या बाबतीत संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, मुंबई तथा अध्यक्ष गट `क` निवड समिती, यांना राहतील तर गट `ड` पदांच्या बाबतीत व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई तथा अध्यक्ष गट `ड` निवड समिती, यांना राहतील. याबाबत कोणालाही कोणताही वाद उपस्थित करता येणार नाही.

२) भरतीसाठी घोषित केलेल्या वरील पदांमध्ये ३१ ऑगस्ट २०११ अखेर पर्यत रिक्त असलेल्या पदांचा समावेश आहे.

३) उमेदवार एकापेक्षा अधिक पदासाठी अर्ज करण्यास इच्छुक असेल तर प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज करणे आवश्यक आहे. तसेच प्रत्येक पदासाठी स्वतंत्रपणे परिक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

४) **शिकाऊ उमेदवार व आय.टी.आय. उत्तीर्ण उमेदवारांना प्रथम प्राधान्य**

५) सदर भरतीच्या नियम/निकषांमध्ये भरती पूर्ण होईपर्यंत शासन अधिसुचना / निर्णय / परिपत्रक / पत्रानुसार बदल झाल्यास त्या-त्या प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

**४) शैक्षणिक अर्हता / अनुभव (अर्ज करतेवेळी उमेदवाराने सदर अर्हता धारण केलेली असणे आवश्यक आहे अन्यथा अर्जाचा विचार केला जाणार नाही.)**

| अ क्र | पदनाम व वेतनश्रेणी | शैक्षणिक अर्हता | शारिरीक क्षमता व अनुभव |
|---|---|---|---|
| १ | परिचर प्रतिरुप रु.५२००-२०२०० + ग्रेड वेतन - १९००. | इयत्ता ९वी उत्तीर्ण. | १) शारिरीक श्रमाचे काम करण्याची क्षमता आवश्यक उदा.अवजड फॉर्मस्, पेपर रिमस्, छापील शिटस् वाहून नेणे.<br>२) मुद्रण प्लेटस् लॉकिंग-अनलॉकिंग आणि स्वच्छ करणे, किरकोळ यांत्रिक ॲडजेस्टमेंट, यंत्रावर कागद फिडींगचे ज्ञान आवश्यक.<br>३) यंत्राचे रोलर्स, इंक डक्ट स्वच्छ करणे, प्लेटस्‌ची सफाई करणे.<br>४) विहित वेगाने उत्पादन देणे.<br>५) प्रतिरुप मुद्रण यंत्रावर (ऑफसेट प्रिंटींग मशिन) ३ वर्षाचा प्रत्यक्ष कामाचा अनुभव. |
| २ | मूलप्रतवाचक रु.५२००-२०२०० + ग्रेड वेतन - १९००. | शालांत परीक्षा उत्तीर्ण. | १) मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषेतील मॅन्युस्क्रिप्ट वाचनाची क्षमता.<br>२) डिक्टेशन, पंक्च्युएशन, स्पेलींग आणि कंपोझिशन या कामात अचूकता आवश्यक आहे. |

**५) वयोमर्यादा :-**

उमेदवाराचे वय दिनांक **१/१०/२०११ रोजी** १८ वर्षापेक्षा कमी नसावे तसेच ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे.

**६) अर्ज करावयाची पध्दत :-**

१) उमेदवारांनी विहीत नमुन्यातील अर्ज **३० x २०** से.मि. (A४ आकारात) आकाराच्या पांढऱ्या जाड कागदावर सादर करावा. **त्यावर पासपोर्ट आकाराचा अलिकडच्या काळातील काढलेला स्वत:चा फोटो स्वत:ची स्वाक्षरी करुन अर्जावर चिकटवावा.** टपालाने अर्ज पाठवितांना भारतीय टपालसेवेमार्फत पाठवावा. अर्ज बंद केल्यावर लिफाफ्यावर स्वत:चे पूर्ण नाव **अर्ज केलेल्या पदाचे नाव ठळक अक्षरात लिहून रेखांकित करावा**.

२) भरलेला अर्ज **व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नीरोड, मुंबई-४०० ००४.** या पत्यावर दिलेल्या अंतिम तारीख व वेळेच्या आंत पोचतील या बेताने डाकेने पाठवावेत किंवा **शासकीय मध्यवर्ती मुद्रणालयाच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळील टपालपेटीत** अंतिम तारीख व वेळेच्या आंत जमा करावेत.

३) **अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख १७/११/२०१२ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत** प्राप्त झालेले अर्जच फक्त स्वीकारले जातील, त्यानंतर आलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. पोष्टाने झालेल्या विलंबाबद्दल हे कार्यालय जबाबदार असणार नाही व त्यासंबंधी कुठलाही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

४) उमेदवारांने विहित नमुन्यामधील अर्जातील सर्व रकाने भरणे आवश्यक आहे. जी बाब अर्जदारास लागू होत नसेल तिथे **लागू नाही** असे नमूद करावे. अर्जदाराने त्याचा प्रवर्ग न चुकता नमूद करावा. अर्जदाराने अर्जात जो प्रवर्ग नमूद केला असेल त्याच प्रवर्गाकरता अर्जदाराचा विचार करणेत येईल.

**७) अर्जासोबत सादर करावयाचे परिक्षा शुल्क**

अर्जासोबत व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई यांचे नावे काढलेला राष्ट्रीयीकृत बँकेचा मुंबई येथे देय असलेला खालील रकमेचा धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट/पोस्टल ऑर्डर) जोडावयाचा आहे. सदर परिक्षा शुल्क ना-परतावा राहील. ते कोणत्याही कारणास्तव परत केले जाणार नाही. डी.डी.च्या पाठीमागील बाजूस अर्जदाराने ज्या पदासाठी अर्ज केला आहे त्या पदाचे नाव, स्वत:चे नाव व पत्ता लिहावा. धनादेश/रोख रक्कम स्वीकारण्यांत येणार नाही.

**परिक्षा (लेखी परीक्षा व मुलाखत) शुल्क** रुपये **१००/-** (रुपये शंभर फक्त) राहील.

**[टिप :- माजी सैनिक यांनी अर्जासोबत परिक्षाशुल्क भरण्याची आवश्यकता नाही.]**

**८) अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे.**

उमेदवाराने अर्जासोबत खालील प्रमाणपत्राच्या सुस्पष्ट दिसतील अशा प्रमाणित केलेल्या सत्यप्रती (Attested) जोडणे आवश्यक आहे. केंद्र / राज्य शासनाचे राजपत्रित अधिकारी, पोस्टमास्तर, मुख्याध्यापक तसेच विशेष प्राधिकृत प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेल्या दाखल्याच्या सत्यप्रतीच स्वीकारल्या जातील. मुळ प्रमाणपत्रे अथवा गुणपत्रके अर्जासोबत जोडू नयेत. मात्र उमेदवाराची मौखिक/तोंडी मुलाखतीसाठी निवड झाल्यास त्यावेळी मुळ प्रमाणपत्रे दाखवावी लागतील.

१) शैक्षणिक अर्हतेची प्रमाणपत्रे / गुणपत्रके.

२) जन्मदिनांकासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेत दिलेला जन्म दाखला / शाळा सोडल्याचा दाखला / शालांत परिक्षा प्रमाणपत्र.

३) आरक्षित पदासाठी अर्ज केला असल्यास सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र.

४) वि.जा.(अ), भ.ज.(ब), व भ.ज.(क), भ.ज.(ड) या प्रवर्गातील आरक्षणाचा लाभ घेवू इच्छिणाऱ्या उमेदवारांसाठी उन्नत आणि प्रगत व्यक्ती व गट (क्रिमीलेअर) या मध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम अधिकाऱ्याने दिलेले सन २०११-१२ साठी वैध असलेल्या प्रमाणपत्राची प्रमाणित सत्यप्रत अर्जासोबत सादर केली तरच त्यांना संबधीत आरक्षणांचा लाभ दिला जाईल, अन्यथा दिला जाणार नाही.

५) अपंग/माजीसैनिक/प्रकल्पग्रस्त/भुकंपग्रस्त/अंशकालीन कर्मचारी या प्रवर्गात मोडणाऱ्या उमेदवारांबाबत सक्षम प्राधिकाऱ्याचा दाखला.

६) अर्जदार भारताचा नागरीक व महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा. त्याला मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे तसेच महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असलेबद्दल अधिवास प्रमाणपत्र धारण केलेले असावे.

७) अनुभवाचे प्रमाणपत्र.

८) परिक्षा शुल्काचे धनाकर्ष / पोस्टल ऑर्डर

९) **एक अलिकडच्या काळातील स्वत:चा पासपोर्ट साईज फोटो स्वत:ची स्वाक्षरी करुन अर्जावर चिटकवावा.**

**९) इतर महत्वाच्या सुचना.**

१) समांतर आरक्षणासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी उदा.माजी सैनिक, खेळाडू, अपंग, प्रकल्पग्रस्त, भुकंपग्रस्त, पदवी-पदविकाधारक अंशकालीन कर्मचारी त्या पुष्टयर्थ सक्षम प्राधिकाऱ्यांच्या प्रमाणपत्राची प्रमाणित सत्यप्रत सादर करणे अनिवार्य राहील.

२) अस्थिव्यंग/अंध/कर्णबधीर/मुकबधीर या स्वरुपाच्या अपंगत्वाबाबत जिल्हा शल्य चिकित्सक यांचे अध्यक्षते खालील त्रिसदस्यीय मंडळाकडील अपंगत्वाचे प्रमाणपत्र आवश्यक राहील. किमान ४०% अपंगत्व असणे आवश्यक आहे. अपंग उमेदवाराची निवड झाल्यास प्रादेशिक वैद्यकीय मंडळाकडून तपासणी होऊन वैध व या पदाकरीता वैद्यकिय दृष्ट्या पात्र ठरल्यासच नेमणूक आदेश देण्यांत येतील.

३) अपंग उमेदवारास लेखनिक आवश्यक असल्यास त्याने तसा अर्ज देणे आवश्यक आहे. लेखनिकास शैक्षणिक अर्हता ज्या पदासाठी लेखी परिक्षा आहे त्या पदाच्या शैक्षणिक अर्हतेपेक्षा कमी असावी. तसेच उमेदवाराचे शैक्षणिक अर्हतेपेक्षा देखील कमी असावी. उमेदवार स्वत: सोबत लेखनिक आणणार असेल तर त्या लेखनिकाच्या शैक्षणिक गुणवत्तेच्या पुराव्या दाखल अभिलेख सोबत सादर करणे आवश्यक राहील. अपंग व्यक्तीसाठी शासन पात्रतेचे निकष ग्राम विकास व जलसंधारण विभागाचे शासन निर्णय अपंग-२००७/प्र.क्र.५२१/आस्था-९ दि.२ जुलै, २००८ नुसार विचारात घेतले जातील.

४) पदवीधर/ पदविकाधारक अंशकालीन उमेदवारांसाठी आरक्षित पदांचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या अर्जदारांनी सुशिक्षीत बेरोजगारांना अर्थसहाय्य या योजनेअंतर्गत शासकीय कार्यालयाचे किमान तीन वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेले असावे. व रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये या अनुभवाची नोंद केलेली असावी.

५) महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ अन्वये विवाहीत उमेदवाराने त्यांच्या अर्जासोबत अर्जाच्या दिनांकास हयात असलेल्या अपत्यांच्या संख्येबाबत विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे बंधनकारक राहील. अर्जदार विवाहीत असेल तर अर्जदाराच्या हयात मुलापैकी दिनांक २८ मार्च २००६ नंतर तिसऱ्या किंवा त्यानंतरच्या अपत्याचा जन्म झालेला नसावा. उमेदवार अविवाहीत असेल तरी सुध्दा लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक राहील.

६) उमेदवारांना लेखी/व्यवसायिक परिक्षेस तसेच मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल. उपस्थित राहिल्याबाबत त्यांना कोणत्याही प्रकारचे प्रवास भाडे अथवा भत्ता देय राहाणार नाही.

७) निवड समिती अध्यक्ष, सदस्य किंवा अधिकारी यांच्यावर निवडी संबधात कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास किंवा प्रलोभन दाखविल्यास संबधित उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

८) पदभरतीची प्रक्रिया अत्यंत तर्कशुध्द व पारदर्शक पध्दतीने गुणवत्तेच्या आधारे पार पाडली जाणार असल्याने कोणीही कोणत्याही प्रलोभनास बळी पडू नये.

९) शासन निर्णय, वित्त विभाग अनियो १००५/१२६/सेवा-४ दिनांक ३१ ऑक्टोबर २००५ अन्वये दिनांक १/११/२००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांसाठी नवीन परीभाषिक अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू राहील.

१०) भरती प्रक्रियेच्या संबंधात काही तक्रारी मतभेद निर्माण झाल्यास न्यायालयीन अधिकार क्षेत्र मुंबई शहर न्यायालयाच्या कक्षेतच राहील.

११) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र.मकसी-१००७/प्र.क्र.३६/का.३६,दि.१० जुलै २००८ अन्वये महाराष्ट्र कर्नाटक सिमा विभागातील महाराष्ट्र शासनाने दावा सांगितलेल्या ८६५ गावांतील मराठी भाषिक उमेदवारांना वरील पदांसाठी अर्ज करता येईल. तथापी त्यांनी सदर ८६५ गावातील १५ वर्षांचे वास्तव्य असलेल्या रहिवाशी असल्याचा सक्षम प्राधिका-याचा विहित नमुन्यातील दाखला सादर करणे अनिवार्य राहिल. त्यानुसार उमेदवार महाराष्ट्र राज्याचा सर्वसाधारण आधिवासी असणे आवश्यक आहे. अनुसूचित जातीसाठी दि.१० ऑगस्ट १९५०, विमुक्त जाती / भटक्या जमातीसाठी दि.२१ नोव्हेंबर, १९६१ इतर मागासवर्गासाठी दि.१३ ऑक्टोंबर १९६७ व विशेष मागास प्रवर्गासाठी दि.१३ जुन, १९९५ या तारखेस किंवा त्यापुर्वी पासुन उमेदवाराचे वा त्याचे वडीलांचे महाराष्ट्रामध्ये अधिवास असणे आवश्यक आहे व त्याप्रमाणे अधिवासाचे पुरावे सादर करणे बंधनकारक राहील.

१२) ज्या पदाच्या लेखी परीक्षा एकाच दिवशी व एकाच वेळी आहे अशा पदांबाबत उमेदवार कोणत्याही एकाच पदासाठी अर्ज करु शकतो. दोन्ही पदासाठी अर्ज केल्यास संबंधीत उमेदवार एका पदाच्या लेखी परीक्षेस न बसण्याबाबत वैयक्तिकरित्या जबाबदार राहील.

१३) उमेदवारांची शासकीय सेवेसाठी निवड होऊन नियुक्ती मिळाल्यास त्यांना शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या सेवा प्रवेशोत्तर परिक्षा, विभागीय परीक्षा आणि इतर परीक्षा व प्रशिक्षण विहित संधीत व विहित कालावधीत उत्तीर्ण व्हावे लागेल. अन्यथा शासनाने वेळोवेळी विहित केलेप्रमाणे सदरची नियुक्ती संपुष्टात आणणे इत्यादी कार्यवाही केली जाईल.

**१०) लेखी परिक्षा व मुलाखतीचे गुणांकन आणि मुलाखतीस व निवडीस पात्र होण्यासाठी किमान गुण :-**

शासन परिपत्रक क्र.एपिटी-२००७/प्र.क्र.३०३(अ)/आस्था-८ दि.१९ मार्च, २००८ सोबतचे परिशिष्ठ ब नुसार लेखी परिक्षा व मुलाखतीच्या गुणांकनाचे स्वरुप खालील प्रमाणे राहील.

| अ.क्र. | पदनाम | लेखी परिक्षेचे गुण | मुलाखती गुण | एकूण गुण |
|---|---|---|---|---|
| १ | परिचर प्रतिरुप | २०० | २५ | २२५ |
| २ | मुलप्रतवाचक | २०० | २५ | २२५ |

**टिप :-** लेखी परिक्षेसाठी प्रश्नपत्रिका मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान आणि अंकगणित प्रत्येक ५० गुण अशी राहिल.

**११) खालील उणिवा असलेले अर्ज अपात्र ठरविण्यांत येतील.**

१) विहित नमुन्यातील नसलेले अर्ज.
२) फोटोवर स्वाक्षरी नसलेले व अर्जावर उमेदवारांची स्वाक्षरी नसलेले अर्ज.
३) विहित मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्ज.
४) विहित पात्रता पूर्ण न करणाऱ्या उमेदवारांचे अर्ज.
५) मजकूर अपूर्ण किंवा चुकीचा भरलेले अर्ज.
६) आवश्यक प्रमाणपत्राच्या प्रमाणित सत्यप्रती न जोडलेले अर्ज.
७) विहित केलेप्रमाणे परिक्षा शुल्क न भरलेली व जोडलेली अर्ज.

**सही/-**
**व्यवस्थापक,**
**तथा अध्यक्ष निवड समिती**
**शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई - ४०० ००४.**

# अर्जाचा नमुना

## शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय,मुंबई : पदभरती २०११ साठी अर्ज

| अर्जदाराने पासपोर्ट आकाराचा अलिकडच्या काळातील काढलेला स्वत:चा फोटो स्वत:ची स्वाक्षरी करुन येथे चिकटवावा |
|---|
| अर्जदाराची सही |

**अर्जाचा कार्यालयीन नोंदणी क्रमांक**

| संवर्ग | अर्ज स्विकृती केंद्राचे नांव | अर्जाचा क्रमांक |
|---|---|---|
| | **शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नी रोड, मुंबई-४०० ००४.** | |

**प्रति**

**व्यवस्थापक,**
**शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय,**
**मुंबई-४०० ००४.**

**विषय :**----------------------------------------- या पदासाठी अर्ज

१) अर्जदाराचे नाव

१अ) संपूर्ण नाव (इंग्रजी मध्ये)

| नाव | वडीलांचे/पतीचे नाव | आडनाव |
|---|---|---|
| | | |

१ब) संपूर्ण नाव (मराठी मध्ये)

| नाव | वडीलांचे/पतीचे नाव | आडनाव |
|---|---|---|
| | | |

१ ) अर्जदार विवाहित महिला असेल तर विवाहापूर्वीचे नाव

| नाव | वडीलांचे नाव | आडनाव |
|---|---|---|
| | | |

२) **पत्रव्यवहाराचा पत्ता**

-----------------------------------
-----------------------------------
-----------------------------------
तालुका ---------------------------
जिल्हा ----------------------------
पीनकोड क्रमांक ---------------------
भ्रमणध्वनी (मोबाईल) क्रमांक ----------------------------

**मुळ राहण्याच्या ठिकाणचा पत्ता**

-----------------------------------
-----------------------------------
-----------------------------------
तालुका ---------------------------
जिल्हा ----------------------------
पीनकोड क्रमांक --------------------

३) अर्जदाराचा इ-मेल आय.डी. --------------------------------------

४) अर्जदाराची जन्मतारीख (अंकामध्ये) ०१/१०/२०११ रोजी उमेदवाराचे वय

| तारीख | महिना | वर्ष |
|---|---|---|
| | | |

| वर्ष | महिने | दिवस |
|---|---|---|
| | | |

जन्मतारीख अक्षरी ------------------------------------------------------------

५) अर्जदार मागासवर्गीय आहे काय? होय/नाही

५अ) मागासवर्गीय असल्यास जातीचा उल्लेख करावा

५ब) अर्जदाराने ज्या प्रवर्गात अर्ज केला आहे त्या प्रवर्गाचे नाव चौकोनात लिहावे

| अनु.जाती | अनु.जमाती | वि.जा.(अ) | भ.ज.(ब) | भ.ज.(क) | भ.ज.(ड) | विमाप्र | इमाव | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |

५ ) अर्जदार उन्नत व प्रगत गटात आहे काय? होय/नाही

आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या विजा-अ,भज-ब,भज-क व भज-ड या प्रवर्गातील उमेदवारांनी ते उन्नत/प्रगत गटात मोडत नसल्याचे सन २०११/१२ साठी वैध असलेले नॉन क्रिमिलेयर प्रमाणपत्राची प्रमाणित सत्यप्रत अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.)

६) अर्जदाराची शैक्षणिक अर्हता

| अ.क्र. | उत्तीर्ण केलेली परिक्षा | विद्यापीठाचे / मंडळाचे नाव | उत्तीर्ण होण्याचे वर्ष | मिळालेल्या गुणांची टक्केवारी | वर्ग/श्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | |
| २ | | | | | |
| ३ | | | | | |
| ४ | | | | | |
| ५ | | | | | |

७) अनुभव असल्यास सविस्तर तपशिल खालील तक्त्यात नमुद करावा

| अ.क्र. | काम केलेल्या संस्थेचे / कार्यालयाचे नांव | पद | कालावधी (पासून-पर्यंत) | अनुभवाचे स्वरुप |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |

८) राष्ट्रीयत्व :-

९) अर्जदार महाराष्ट्राचा मुळ रहिवासी आहे काय? होय/नाही

९अ) अर्जदार १० जुलै २००८ च्या शासन परिपत्रकानुसार महाराष्ट्र कर्नाटक सीमा विभागातील विहित ८६५ गांवातील रहिवाशी आहे काय? होय/नाही

१०) अर्जदाराने नोकरीसाठी सेवायोजन कार्यालयाकडे नाव व नोंदणी केली आहे काय? होय/नाही

असल्यास नोंदणी कार्यालयाचे नाव ------------------------------------------------------

नोंदणी क्रमांक ____ दिनांक ____

११) डिमांड ड्राफ्ट / पे आर्डरचा तपशिल

| डी.डी.काढणाऱ्या बँकेचे व शाखेचे नांव | धनाकर्ष (डी.डी.) क्रमांक | दिनांक | रक्कम रु. | धनाकर्ष ज्या बँकेत वटवायचा त्या बँकेचे व बँक शाखेचे नाव |
|---|---|---|---|---|
| | | | | |

१२) अर्जदार स्त्री आहे की पुरुष स्त्री/पुरुष स्त्री/पुरुष

१२अ) अर्जदार स्त्री असल्यास महिला आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छित आहे काय होय/नाही

१३) अर्जदार खालीलपैकी एखाद्या प्रकारात मोडत असल्यास त्या प्रकाराचे नाव चौकटीत लिहावे

१) अपंग
२) माजी सैनिक
३) खेळाडू
४) स्वातंत्र्यसैनिक नामनिर्देशित पाल्य
५) प्रकल्पग्रस्त
६) भुकंपग्रस्त
७) पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन कर्मचारी
८) हंगामी क्षेत्र (फवारणी) कर्मचारी
९) अंगणवाडी सेविका

चौकटीत प्रवर्गाचे नाव लिहावे

१३अ) १) अर्जदार स्वातंत्र सैनिकाचे पाल्य आहे काय? होय/नाही
२) अर्जदार सन १९९१ चे जनगणना कर्मचारी आहे काय? होय/नाही
३) अर्जदार सन १९९४ नंतरचे निवडणुक कर्मचारी आहे काय? होय/नाही

१४) अर्जदार अपंग असल्यास अपंगत्वाचा प्रकार ____ अपंगत्वाची टक्केवारी ____

१५) अर्जदार विवाहित आहे काय?

होय/नाही ____ विवाहित असल्यास हयात मुलांची संख्या ____

१६) उमेदवाराने अंशकालीन कर्मचारी म्हणून काम केलेबाबत सेवायोजन अधिकारी यांचा दाखला असल्यास अंशकालीन सेवेचा कालावधी

| अ.क्र. | सेवा केलेल्या कार्यालयाचे नाव व पत्ता | पासून | पर्यंत | वर्ष | महिने |
|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | |
| २ | | | | | |
| ३ | | | | | |

## प्रतिज्ञापत्र

मी असे प्रमाणित करतो / करते की, आपले विभागातील (पदाचे नांव) ----------------------- या संवर्गातील पदे भरणे संबंधीत जाहिरात मी काळजीपूर्वक वाचली असुन सदर जाहिरातीतील अटी व शर्ती मला मान्य आहेत. तसेच मी असे प्रमाणित करतो / करते की, अर्जामध्ये दिलेली माहिती खरी आहे. त्या पुष्टयर्थ मी प्रमाणपत्राच्या स्वाक्षांकीत प्रती सोबत जोडल्या आहे. तसेच असे प्रमाणित करतो / करते की, वर दिलेली माहिती खोटी असल्याचे आढळून आल्यास माझी या पदासाठी उमेदवारी रद्द होईल व मी कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहील. तसेच नोकरीवर हक्क राहणार नाही याची मला जाणीव आहे. याबाबत नियुक्ती प्राधिकाऱ्यांचा निर्णय माझेवर बंधनकारक राहील. माझी याबाबत कोणतीही तक्रार राहणार नाही.

**ठिकाण :** **अर्जदाराची सही**

**दिनांक :** **नाव :**

---

## प्रमाणपत्र

### नमुना-अ

### (नियम ४ पहा)

मी श्री / श्रीमती / कुमारी -----------------------------------------------------------------------

श्री -------------------------- यांचा / याची मुलगा / मुलगी / पत्नी / वय -------------------- वर्षे

राहणार -------------------------------------- याद्वारे पुढीलप्रमाणे असे जाहिर करतो / करते की,

१) मी ------------------------------------------ या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

२) आज रोजी मला ------------- (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८ मार्च २००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ------------- आहे. (असल्यास जन्म दिनांक नमुद करावा).

३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००६ व तदनंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

**ठिकाण :** **अर्जदाराची सही**

**दिनांक :** **नाव :**